पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD, PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र. ३०५४** **दि.२१/०९/२०१९**

## प्रेस नोट दिनांक - २१/०९/२०१९

### शाळेजवळील १०० यार्डाच्या आतमध्ये सिगारेट व तंबाखूजन्य पदार्थ विक्रीसाठी ठेवताना मिळून आलेने युनिट १, गुन्हे शाखाच्या टिमने एक इसमांवर कोप्ता अंतर्गत खटला भरण्यात आला आहे.

---

आज रोजी वरिष्ठांच्या आदेशाने युनिट १ कडील अधिकारी व कर्मचारी असे शिवाजीनगर पो.स्टे. चे हद्दीत सराईत गुन्हेगारांचा शोध घेणेसाठी पेट्रोलींग फिरत असतांना पो उप निरी उत्तम बुदगुडे यांना त्यांचे बातमीदाराकडून मिळालेल्या बातमी प्रमाणे, भारत इंग्लीश स्कुल, शिवाजीनगर पुणे येथे १०० यार्ड अंतराचे आंत आदर्श सुपर मार्केट या किराणा मालाच्या दुकान नं. ६ प्रगती टॉवर, शिवाजीनगर, पुणे मध्ये सिगारेट व तंबाखूजन्य पदार्थ विक्रीसाठी ठेवले असतांना एक इसम मिळून आलेने त्यास ताब्यात घेवून त्याचे नांव पत्ता विचारता त्याने आपले नांव मदनलाल नारायणलाल परिहार, वय २५ वर्षे, रा. संकल्प सरनिवास शिवाजीनगर, पुणे असे असलेचे सांगीतले. त्याचे दुकानाची पहाणी करता, दुकानामध्ये त्याने विक्रीसाठी ठेवलेले सिगारेट व तंबाखूजन्य उत्पादने कि.रु ५२,६२५/- चा माल दोन पंचासमक्ष जप्त करण्यात आलेला आहे. सदरच्या इसमा विरुध्द सिगारेट व इतर तंबाखु उत्पादने (जाहीरातीस प्रतिबंध आणि व्यापार, वाणिज्य, उत्पादन पुरवठा आणि वितरण विनियमन) अधिनियम २००३ व नियम २००४ चे कलम ६(ब) २४ अन्वये खटला भरण्यात आला असून त्यास मा. न्यायालयात हजर रहाणेसाठी समज देण्यात आली आहे.

सदरची कारवाई ही मा. वरिष्ठांच्या आदेशाने व वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अरुण वायकर, यांचे मार्गदर्शनाखाली पो. उपनिरी उत्तम बुदगुडे, पो.उप निरी. हनुमंत शिंदे, पो.हवा. ५४३३ जिनेडी, पो.ना. २२०४ वाघवले, पो.ना. २७९० खडके, पो.ना. ११७८ मोमीन, पो.ना. ६४४२ स्वामी पो.ना. १६६५ पिंगळे पो.हवा. योगेश जगताप यांनी केली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
युनिट १, गुन्हे शाखा, पुणे शहर